

धर्मांतरण विरोधी कायदा कधी आणणार-आ.उमा खापरे

e Paper

# दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in | बुधवार दिनांक 16/07/२०२५ | METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 156 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com


# शशिकांत शिंदे शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे नवे प्रदेशाध्यक्ष!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याची चर्चा मागील काही दिवसांपासून राजकीय वर्तुळात होती.

मात्र, या चर्चा राष्ट्रवादीच्या काही नेत्यांनी फेटाळून लावल्या होत्या. यानंतर मंगळवार (दि. १५) रोजी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाची मुंबईत एक महत्वाची बैठक पार पडली. या बैठकीत अखेर आमदार शशिकांत शिंदे यांची नवे प्रदेशाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली आहे. या बैठकीला शरद पवार, जयंत पाटील, जितेंद्र आव्हाड, शशिकांत शिंदे यांच्यासह पक्षाचे आदी नेते उपस्थित होते.शशिकांत शिंदे यांची राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे नवे प्रदेशाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आल्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधत पहिली प्रतिक्रिया दिली आहे.



शशिकांत शिंदे म्हणाले की,"मला राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचा प्रदेशाध्यक्ष म्हणून माझ्यावर जबाबदारी देण्यात आल्यामुळे मी सर्वांचे आभार व्यक्त करतो. तसेच मी महाराष्ट्रातील जनतेला ग्वाही देतो की राज्यातील प्रत्येक प्रश्नांना आणि अन्यायाला वाचा फोडण्याचं काम मी करेन. तसेच पक्ष संघटना राज्यात सगळीकडे पोहोचवण्यासाठी प्रयत्न करेन. पक्षात अनेक जेष्ठ नेते असतानाही मला जी प्रदेशाध्यक्षपदाची संधी मिळाली, या संधीचं सोनं करण्याचा मी प्रयत्न करेन, असं ते म्हणाले आहेत.

# महाराष्ट्राला 'अ' श्रेणीत सुवर्णपदक!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

नवी दिल्ली : 'एक जिल्हा एक उत्पादन 2024' अंतर्गत महाराष्ट्राने चमकदार कामगिरी केली असून राज्याला 'अ' श्रेणीतील सुवर्ण पदक प्राप्त झाले आहे. यासह रत्नागिरी, नागपूर, अमरावती, नाशिक आणि अकोला या जिल्ह्यांनी कृषी आणि गैर-कृषी क्षेत्रातील विशिष्ट उत्पादनांसाठी सुवर्ण, रौप्य, कांस्य आणि विशेष उल्लेख पुरस्कार पटकावले आहेत.

भारत मंडपममध्ये राष्ट्रीय 'एक जिल्हा, एक उत्पादन' 2024 पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्री पीयूष गोयल, दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता आणि वाणिज्य व उद्योग राज्यमंत्री जितिन प्रसाद यांच्या प्रमुख उपस्थित पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. महाराष्ट्राने आपल्या उत्पादनांची नाविन्यपूर्णता, उच्च दर्जा आणि वैशिष्ट्यपूर्ण गुणवत्तेने राष्ट्रीय स्तरावर वर्चस्व प्रस्थापित केले.




'एक जिल्हा, एक उत्पादन' हा उपक्रम केंद्र शासनाचा एक महत्त्वाकांक्षी उपक्रम आहे, ज्याचा उद्देश प्रत्येक जिल्ह्याच्या वैशिष्ट्यपूर्ण उत्पादनांना प्रोत्साहन देऊन स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देणे आणि जागतिक बाजारपेठेत त्यांचा ठसा उमटवणे आहे. या उपक्रमांतर्गत 2024 च्या पुरस्कार समारंभात महाराष्ट्राने आपली उत्कृष्टता सिद्ध करून विविध श्रेणीत पुरस्कार मिळविले. हे पुरस्कार जिल्हा, राज्य आणि परदेशातील भारतीय दूतावास या तीन गटांमध्ये वितरित करण्यात आले. परदेशातील भारतीय दूतावासांनी या समारंभात दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभाग घेतला. राज्यांच्या 'अ' श्रेणीत महाराष्ट्रासह आंध्र प्रदेश, पंजाब आणि उत्तर प्रदेश राज्यांनीही सुवर्णपदक मिळवले आहे. राज्याच्यावतीने उद्योग संचालनालयाचे विकास आयुक्त दीपेंद्र सिंग कुशवाह यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
बुधवार दिनांक 16/07/२०२५
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# थेरगाव परिसरातील चुकीची आरक्षण रद्द करावे-सतीश दरेकर

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत





पिंपरी चिंचवड महानगरपालिका वतीने विकास आराखडा प्रसिद्ध करण्यात आला. यामध्ये थेरगाव परिसरातील दाट वस्ती असलेल्या परिसरात 24 मीटर, 12 मीटर, 15 मीटरचे डीपी रोड प्रस्तावित केले आहेत. घनदाट लोकवस्ती असलेल्या थेरगाव परिसरातील ही आरक्षणे रद्द करण्यात यावी, अशी मागणी माजी नगरसेवक सतीश दरेकर यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे सतीश दरेकर यांनी निवेदनाद्वारे मागणी केली. या निवेदनात सतीश दरेकर यांनी नमूद केले आहे की, थेरगाव परिसरात विशेषता: पडवळ नगर, जय मल्हार नगर, अशोक सोसायटी, डोंगरे कॉर्नर, गणेश नगर ,पंचशील कॉलनी या परिसरात पिंपरी चिंचवड महानगरपालिका वतीने नागरिकांना विश्वासात न घेता डीपी रोड प्रस्तावित केले आहे, तसेच 30 मीटर एच सी एम आर टी चे आरक्षण टाकले आहे. यामुळे थेरगाव परिसरातील हजारो नागरिकांची घरे जमीनदोस्त करावी लागणार आहेत. येथील नागरिकांनी अनेक मेहनतीने आपली घरे बांधली आहेत.

मात्र, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या या विकास आराखड्यामुळे अनेकांची घरे बाधित होणार आहेत त्यामुळे सदर आरक्षण रद्द करावे, अशी मागणी सतीश दरेकर यांनी आपल्या निवेदनाद्वारे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे केली आहे.

# विकास आराखड्याला ग्रामस्थांचा विरोध

## बापू कातळे यांचा आंदोलनाचा इशारा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



आरक्षणामुळे महानगरपालिकेच्या प्रारूप विकास आराखड्यातील किवळे गावातील अनेक शेतकरी आणि नागरिकांवर अन्याय होणार आहे. या आरक्षणाला ग्रामस्थांचा तीव्र विरोध सुरू झाला आहे. आरक्षणामुळे अनेक शेतकरी भूमिहीन होणार असून, अनेकांच्या राहत्या घरांवरही कुऱ्हाड कोसळणार आहे. दरम्यान, सदर विकास आराखड्याविरोधात सामाजिक कार्यकर्ते बापू कातळे यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे.याबाबत बोलताना शेतकरी संदीप तरस म्हणाले की, वडिलोपार्जित ७२ गुंठे शेती आणि आमचं राहते घर पालिकेने आरक्षित केले आहे. १८ मीटर रस्ता आणि सांडपाणी प्रक्रिया केंद्र या ठिकाणी उभारण्यात येणार आहे. त्यामुळे आमचं सर्वस्व हिरावलं जाण्याची भीती आहे.ग्रामस्थांनी हा निर्णय लोकशाहीविरोधी ठरवला असून आरक्षण टाकण्यापूर्वी गावकऱ्यांना विश्वासात न घेतल्याचा आरोप केला आहे. पर्यावरणप्रेमी हरीश कदम यांनी दफनभूमी नदीच्या सान्निध्यात उभारण्याच्या निर्णयावर तीव्र आक्षेप घेत या कृतीमुळे पर्यावरण आणि जनतेच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होणार आहे, असे मत कदम यांनी व्यक्त केले आहे.

दरम्यान अनेक नागरिकांना महापालिकेच्या प्रारूप विकास आराखड्याबाबत माहिती नाही. त्यामुळे त्यांनी या आरक्षणांना अद्याप विरोध केलेला नाही. मात्र आम्ही नागरिकांमध्ये जाऊन जनजागृती करीत असल्याचे बापू कातळे यांनी सांगितले.

# शहरातील अनधिकृत बांधकामांवर कारवाईची मोहीम सुरू




दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

आयुक्त शेखर सिंह यांचे निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या अतिक्रमण कारवाईत थेरगाव व रहाटणी येथील महानगरपालिकेची परवानगी न घेता अनधिकृत पद्धतीने उभारण्यात आलेल्या मजल्यांचे तसेच पत्रा शेडचे १३,३१५ चौरस फूट क्षेत्रफळ असलेली ८ अनधिकृत बांधकामे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

थेरगाव येथील कारवाईमध्ये ग क्षेत्रीय कार्यालयाचे क्षेत्रीय अधिकारी किशोर ननावरे यांच्या नेतृत्वात महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते. तसेच कारवाई दरम्यान या परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. या निष्कासन कारवाईमध्ये पोकलेन व जेसीबी यांचा वापर करण्यात आला. शिवाय यावेळी अग्निशमन वाहने आणि रुग्णवाहिका याठिकाणी तैनात करण्यात आल्या होत्या.तर महापालिका यंत्रणेसह पोलीस, वीज वितरण कंपनीचे अधिकारी कर्मचारी देखील या कारवाईमध्ये सहभागी झाले होते.

महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आलेल्या कारवाई मध्ये थेरगाव येथील गुजरनगर, लक्ष्मणनगर तसेच रहाटणी गावठाण येथील अनधिकृत बांधकामांचा समावेश होता. येथील इमारती मध्ये अनधिकृत पद्धतीने उभारलेले इमारतींचे मजले तसेच पत्र्यांच्या बांधकामांवर महापालिकेच्या वतीने निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

शहरातील अनधिकृत बांधकामांवर महानगरपालिकेच्या वतीने कारवाईची मोहीम सुरू राहणार आहे. पिंपरी चिंचवड शहराच्या शाश्वत विकास सोबतच येथील नागरिकांना सर्वोत्तम सुविधा उपलब्ध करून देण्याचा महानगरपालिकेचा प्रयत्न आहे. शहरात अनधिकृतपणे बांधकाम करणाऱ्या बांधकाम धारकांवर कडक कारवाई करण्यात येणार आहे.

# भूसंपादनाची सर्व प्रकरणे 5 सप्टेंबरपर्यंत निकाली काढा - जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील भूसंपादनाचे अनेक विषय प्रलंबित आहेत. अशी प्रकरणे तातडीने मार्गी लावण्यासाठी भूसंपादन, भूमिअभिलेख, महानगरपालिका आणि जागेशी संबधित असलेल्या विभागांच्या अधिकाऱ्यांचा सहभाग असलेल्या विशेष टास्क फोर्सची स्थापना करण्याचे निर्देश आज जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले. यामध्ये प्राधान्याने रस्त्यांच्या विषयांचा विचार करून आपसात समन्वय ठेऊन सर्व प्रकरणे येत्या ५ सप्टेंबरपर्यंत मार्गी लावा, असेही आदेश त्यांनी संबधित विभागांच्या अधिकाऱ्यांनादिले.महानगरपालिकेच्या वतीने रस्त्यांसह विविध विकास प्रकल्पांसाठी भूसंपादनाची आवश्यकता भासते. यासाठी आवश्यक सर्व कार्यवाही पूर्ण करण्यासाठी भूसंपादन, भूमी अभिलेख, महानगरपालिका आणि शासनाच्या संबधित विभागाकडून कामकाज केले जाते. तांत्रिक बाबींमुळे समन्वयाअभावी बरीचशी प्रकरणे प्रलंबित राहतात. या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्याच्या उद्देशाने रस्ते विकास तसेच विविध विकास प्रकल्प मार्गी लावण्यासाठी आवश्यक असणाऱ्या भूसंपादनाच्या प्रलंबीत प्रस्तावांचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली आणि महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या प्रमुख उपस्थितीत पिंपरी चिंचवड महापालिकेच्या मुख्य इमारतीमध्ये जिल्हा प्रशासन आणि महानगरपालिका प्रशासनाची संयुक्त बैठक पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनात आज पार पडली. त्यावेळी डुडी बोलत होते.या बैठकीस भूसंपादन, भूमी अभिलेख आणि महानगरपालिका प्रशासनाचे अधिकारी उपस्थित होते. यामध्ये महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, शहर अभियंता मकरंद निकम, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, प्रमोद ओंभासे, नगररचना व विकास विभागाचे उपसंचालक प्रसाद गायकवाड, सहशहर अभियंता देवन्ना गट्टूवार, मनोज सेठीया, उपआयुक्त संदीप खोत, सहाय्यक आयुक्त उमेश ढाकणे, विशेष अधिकारी किरण गायकवाड यांच्यासह भूसंपादन विभागाचे उपजिल्हाधिकारी कल्याण पांढरे, भूमि अभिलेख उपअधिक्षक विकास गोफणे, पल्लवी पिंगळे, नगर भूमापन अधिकारी अमित ननावरे, प्रभारी भूसंपादन अधिकारी उषा विश्वासराव, योगेश देशपांडे आदी उपस्थित होते.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

बुधवार दिनांक 16/07/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# धर्मांतरण विरोधी कायदा कधी आणणार-आ.उमा खापरे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत







पंडिता रमाबाई मुक्ति मिशन केडगाव, तालुका दौंड, जिल्हा पुणे येथील संस्थेमध्ये दाखल असणाऱ्या अनाथ मुलींवर ख्रिश्चन धर्म स्वीकारण्यासाठी अत्याचार केले जातात. त्यांचा छळ केला जातो, त्यांच्याकडून सार्वजनिक शौचालय साफ करून घेणे, त्यांचे केस कापणे, त्यांच्या देवतांच्या मूर्ती फोडून धर्मांतर करण्यासाठी दबाव आणला जातो. या संस्थेची मान्यता रद्द करून धर्मांतरण विरोधी कायदा पुढील अधिवेशनात आणावा, अशी मागणी आमदार उमा खापरे यांनी मंगळवारी विधान परिषदेत केली.या संस्थेमध्ये दाखल झालेल्या अनाथ मुलींवर अत्याचार केले जातात, तसेच त्यांना वैद्यकीय उपचारांच्या नावाखाली परदेशात पाठवले जाते. त्यांचे पुढे काय होते ? त्या परत भारतात आल्या का नाही याची माहिती दिली जात नाही. येथील मुलींना त्यांच्या पालक व नातेवाईकांशी संपर्क ठेवू दिला जात नाही. याविरुद्ध एका मुलीने तिथून सुटका करून घेऊन पालकांकडे तक्रार केली. याविषयी नंतर यवत पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल झाला. तेंव्हा मी प्रत्यक्ष यवत पोलीस स्टेशनला जाऊन आले. या धर्मांतराच्या गंभीर विषयाकडे सभागृहाचे लक्ष वेधण्यासाठी ११ जुलै २०२४ रोजी, एक वर्षापूर्वी मी औचित्याचा मुद्दा म्हणून हा प्रश्न उपस्थित केला होता.

त्यावेळी तत्कालीन गृहमंत्र्यांनी देखील समिती नेमून चौकशी अहवाल सादर करून यावर कारवाई केली जाईल असे आश्वासन सभागृहात दिले होते. एक वर्ष झाले तरी अध्यापही या संस्थेवर कारवाई झाली नाही. अशा घटना घडणे ही समाजाला लागलेली कीड आहे ही कीड वाढू नये यासाठी धर्मांतरण विरोधी कायदा आणणे आवश्यक आहे. तरी पुढील अधिवेशनात धर्मांतरण विरोधी कायदा करून पंडिता रमाबाई मुक्ति मिशनची मान्यता रद्द करावी व तसा अहवाल केंव्हा सादर करणार हे सभागृहाला अवगत करावे अशी मागणी आमदार उमा खापरे यांनी मुंबई येथे सुरू असणाऱ्या पावसाळी अधिवेशनात मंगळवारी (दि. १५ जुलै) विधान परिषदेत सभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्याकडे केली.यावर उत्तर देताना राज्यमंत्री पंकज भोयर यांनी सांगितले की, पंडिता रमाबाई मुक्ति मिशन केडगाव, तालुका दौंड, जिल्हा पुणे या संस्थेमध्ये घडलेल्या अत्याचाराच्या घटनेविषयी ८ डिसेंबर २०२३ रोजी शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करून तो यवत पोलीस स्टेशन कडे वर्ग करण्यात आला आहे. या घटनेची चौकशी करण्यासाठी पोलीस उपनिरीक्षक दर्जाच्या महिला अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

पुढील एका महिन्यात संबंधित अधिकाऱ्यांकडून अहवाल घेऊन जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

तसेच संस्थेची मान्यता रद्द करण्यासाठी अहवालावर अभिप्राय देऊन संबंधित विभागाकडे सादर केला जाईल असे आश्वासन राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी सभागृहात दिले.

# पुणे महापालिकेतील वाढीव दराच्या घनकचरा निविदा रद्द!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाशी संबंधित निविदा प्रक्रिया पाच ते सात टक्के जास्त दराने आल्याने संपूर्ण निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आली आहे. त्यामुळे महापालिकेचे कोणतेही आर्थिक नुकसान झालेले नाही,' अशी माहिती राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिली.घनकचरा व्यवस्थापन निविदा प्रक्रियेतील अनियमिततेबाबत खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे आमदार भाजपचे भीमराव तापकीर आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) आमदार बापूसाहेब पठारे यांनी तारांकित प्रश्नाद्वारे हा मुद्दा उपस्थित केला होता. त्याला उत्तर देताना मिसाळ यांनी ही माहिती दिली.राज्य शासनाने महानगरपालिकेला या निविदा प्रक्रियेची चौकशी करून योग्य ती कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. त्या अनुषंगाने महानगरपालिकेने निविदा प्रक्रिया रद्द केली आहे. या निविदा प्रक्रियेमुळे महानगरपालिकेला कोणतेही थेट आर्थिक नुकसान झालेले नाही. मात्र, निविदा प्रक्रियेदरम्यान झालेला प्रशासकीय खर्च कोणाकडून वसूल करायचा याबाबत महापालिकेला निर्देश दिले जातील.

तसेच लोकप्रतिनिधींना विशिष्ट निविदांबाबत काही शंका असल्यास किंवा कुठल्या निविदांची सखोल चौकशी आवश्यक आहे, असे वाटत असल्यास त्यांनी संबंधित माहिती देण्याचे आवाहनही मिसाळ यांनी यावेळी केले.

संबंधित प्रकरणांमध्ये चौकशी करून योग्य ती कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968